## शिक्षण उपसंचालक ,पुणे विभाग, पुणे-१ या कार्यालयातील प्राथमिक शाखेमार्फत शिक्षण प्रमुख,/ प्रशासन अधिकारी महानगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे, पिंपरी चिंचवड,अहमदनगर ,सोलापूर व पुणे/अहमदनगर/ सोलापूर जिल्हयातील नगरपालिका शिक्षण मंडळांची कार्यालये व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद , पुणे, सोलापूर व अहमदनगर या कार्यालयाकडून प्राप्त होणा-या शिक्षकांचे वैद्यकीय प्रतिपूर्तीकरिता प्रस्ताव सादर करतांना सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी.

| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| १ | वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती/ अग्रीम मागणारा संबंधित कर्मचारी ज्या खाजगी प्राथमिक शाळेत कार्यरत आहे त्या शाळेची मूळ शासन परवानगी सुरवातीस विनाअनुदानित व पुढे अनुदानित तत्वावर मंजूर केल्याच्या शासन प्रती आहे/ नाही |
| २ | संबंधीत कर्मचारी जरी १०० टक्के अनुदानित शाळेत कार्यरत असला जरी त्याची वैयक्तिक मान्यता ही १०० टक्के अनुदानित तुकडी/ वर्गावरीलच असल्याची खातरजमा (कोणत्याही परिस्थितीत कायम विना अनुदानित, विना अनुदानित किंवा अंशतः अनुदानित तुकडीवरील कर्मचा-याचे वैद्यकीय देयक सादर होणार नाही याची दक्षता घ्यावी) पुराव्यासहित करण्यातयेऊन तसे पुरावे/ प्रमाणपत्र |
| ३ | वैद्यकीय देयकांच्या सुरवातीला नमूद केलेल्या कागदपत्राची अनुक्रमणिका |
| ४ | क व ड पूर्ण भरलेले फॉर्म |
| ५ | जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्र |
| ६ | मूळ डिसचार्ज कार्ड |
| ७ | रुग्णाला रुग्णालयात दाखल केल्यानंतर दाखल केलेल्या वॉर्डाच्या प्रकाराचे प्रमाणपत्र |
| ८ | तातडीचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ९ | औषधामध्ये अन्न, टॉनिक व अल्कोहोल इत्यादींचा समावेश नसल्याबाबत प्रमाणपत्र |
| १० | रुग्ण अवलंबत्वाचे प्रमाणपत्र |
| ११ | पती/ पत्नी शासकीय वा निमशासकीय अथवा खाजगी आस्थापनेवर नोकरी करीत आहेत किंवा कसे याबाबतचे प्रमाणपत्र |
| १२ | असल्यास त्या दोघांपैकी एकाने शासन निर्णय दिनांक १८ ऑगस्ट १९९९ मधील परिच्छेद ६ नुसार पती/ पत्नीच्या कार्यालयामध्ये वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती मागणी केली नसल्याबाबतचे संबंधित नोकरीच्या कार्यालयांचे प्रमाणपत्र |
| १३ | वैद्यकीय देयकांची छाननी आपल्या स्तरावरुन करण्यात आल्यानंतर शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमएजी २००५/९ प्र क्र १ आरोग्य-३ दिनांक १९.३.२००५ नुसार जेवढी रक्कम देय आहे त्या रकमेची गणना करुन स्पष्ट शिफारस |
| १४ | विहित नमून्यात कुटुंब प्रमाणपत्र आणि रेशनिंग कार्ड सत्य प्रत तसेच २ पेक्षा जास्त अपत्य असल्यास कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्याचे प्रमाणपत्र |
| १५ | लेखा परिक्षणात वैद्यकीय देयकाच्या रक्कमेची वसूली निघाल्यास सदर रक्कम एक रक्कमी वसूल करण्याबाबतचे हमीपत्र |
| १६ | वैद्यकीय देयकासोबत खर्चाच्या मूळ पावत्या स्वतंत्र कागदावर क्रमाने चिकटवून औषधासाठी खर्च केलेल्या रक्कमेची (मूळ पावत्यावरुन) स्वतंत्र यादी |
| १७ | याबाबत पूर्वी अग्रीम रक्कम घेतली होती काय किंवा इतर सहकारी संस्था/ विमा कंपनी यांचेकडून आर्थिक मदतीचे प्रमाणपत्र |
| १८ | अपघातामुळे उदभवणारे वैद्यकीय खर्च असेल तर अपघाताची नोंद पोलिस ठाण्यात केल्याची व पंचनाम्याची प्रत (FIR) |

| | |
|---|---|
| १९ | विवाहित कर्मचारी असेल आणि जर त्याने सासू सास-याच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्तीची मागणी केल्यास भविष्यात आई वडिलांच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करणार नसल्याबाबतचे प्रमाणपत्र |
| २० | रुग्ण निवृत्तीवेतन धारक असल्यास निवृत्तीवेतन आदेशाची प्रत |
| २१ | ४००००/- रकमेचेवरील वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती असल्यास विशेष बाब म्हणूंन शासकीय कर्मचायास त्याच्यां आजारावरील झालेल्या खर्चास मान्यता देण्याबाबत विभागाची खात्री झाल्यास योग्य समर्थन करुन/ समर्थनात कर्मचा-याची आर्थिक स्थिती आजाराचे गांभीर्य, आजारात झालेले रुग्णाचे दुर्दैवी निधन, आजारामुळे आलेली विकलांगता इ. चा समावेश करुन प्रस्ताव सादर केला आहे काय ? |
| २२ | रु. ४००००/- पेक्षा जास्त रकमेची वैद्यकीय देयके असल्यास दोन प्रतीत |
| २३ | संबंधीत मागणीकर्ता कर्मचारी जर विवाहित स्त्री असेल तर त्यांचे **Marriage Certificate,** किंवा विवाहानंतर नांव असल्याबाबतचे प्रमाणपत्र/ पुरावा आवश्यक |
| २४ | महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ मधील ११ नुसार वैद्यकीय देयकांच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी उपचार झाल्यापासून एक वर्षाचे आत सादर केले आहे काय याची खातरजमा करणारा पुरावा/ प्रमाणपत्र |
| २५ | प्रस्तुत देयकाचे अंतर्गत लेखापरिक्षण संबंधित जिल्हा परिषद/ महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालयाचे प्रमाणपत्र |
| २६ | संबंधित मागणीकर्त्या कर्मचा-याचे निधन झाले असल्यास मृत्यु प्रमाणपत्र सादर करावे व त्याचप्रमाणे संबंधित कर्मचा-याचे मृत्युनंतर सदर देयक कोणास देय ठरेल याबाबत वारसाहक्क प्रमाणपत्र |
| २७ | संबंधित कर्मचा-याची प्राथमिक शाळा कोणत्या क्षेत्रात आहे ते तपासून अनुदानाच्या टक्केवारीनुसार संबंधितांस शासन स्तरावरुन शासन हिस्सा म्हणून किती रक्कम देय ठरते याची माहिती |
| २८ | वरिल सर्व बाबींची पूर्तता होत असल्याचे प्रमाणपत्र |